**प्रेस नोट**

**प्रति,**

संपादक,

दैनिक, लोकमत / सकाळ / संचार / दिव्य मराठी / पुढारी.

क्र.पशा-६ /मुख्य.युवा.प्रशिक्षण/जाहिरात/२०२४- CB - 6915

दि.०४/०९/२०२४

**विषय :- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनाअंतर्गत जाहिरात देणेबाबत...**

* * * * *

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीस आस्थापनेवरील एकुण १४३ रिक्त पदे ( प्रशिक्षणार्थी ) भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असुन योजनेचा कालावधी हा **सहा (६) महिने** असणार आहे.

१) सदर योजनेचा लाभ घेणेकरीता उमेदवाराचे वय १८ ते ३५ वयोगटामध्ये असणे आवश्यक आहे.

२) उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास, आयटीआय / पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी असावी. मात्र शिक्षण चालु असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत.

३) उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.

४) उमेदवारांची आधार नोंदणी असणे आवश्यक आहे.

५) उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.

६) उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

७) शैक्षणिक अर्हतेप्रमाणे उमेदवारास १२ वी ( रु.६,०००/- ), डिप्लोमा / आयटीआय ( रु.८,०००/- ) व पदवी (रु.१०,०००/-) विद्यावेतन देण्यात येईल.

८) उमेदवाराकडे MS-CIT, मराठी आणि इंग्रजी ३० व ४० प्र.श.मि.इ.बाबतचे प्रमाणपत्र असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

९) सदर प्रशिक्षणार्थीची नियुक्ती कोणत्याही विशिष्ट पदावर करावयाची नसुन ती **" प्रशिक्षणार्थी "** म्हणुन असेल.

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी येताना आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, कागदपत्रे व स्वत:चे शैक्षणिक कागदपत्रे सोबत घेऊन पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथील **अलंकार हॉल येथे दि.०९/०९/२०२४ रोजी १०.०० वा.** हजर रहावे.

वरील नमुद मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गतची **जाहिरात** वर्तमान पत्रात देण्यात यावी ही विनंती.

**( विजयालक्ष्मी कुर्री )**
**पोलीस उप-अधीक्षक (मुख्या.)**
**सोलापूर ग्रामीण**